# संजीवनी युवा प्रतिष्ठानतर्फे रोजगाराची सुवर्णसंधी

**कोपरगाव (प्रतिनिधी)–** संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून कोपरगाव तालुका व परिसरातील युवक-युवतींसाठी पुणे येथील नामांकित मल्टीनॅशनल कंपन्यांमध्ये थेट भरतीची संधी निर्माण करण्यात आली आहे, अशी माहिती देण्यात आली आहे.

या रोजगार मेळाव्याच्या आयोजनामागे युवानेते विवेक कोल्हे यांचे दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शन लाभले असून त्यांच्या प्रयत्नांतून आजवर हजारो युवकांना संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या रोजगार उपक्रमांद्वारे नोकऱ्या मिळाल्या आहेत. या उपक्रमाद्वारे अनेक कुटुंबांचा आर्थिक कणा मजबूत केला आहे. यावेळी पुणे येथील नामांकित कंपन्यांमध्ये डिप्लोमा इन मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन असलेल्या उमेदवारांना नोकरीची संधी मिळणार आहे. वयाची अट १८ ते ३० वर्षांपर्यंत असून एकत्रित पगार १९ ते २५ हजारपर्यंत मिळणार आहे. डबल ओव्हरटाईम, ट्रान्सपोर्ट व कॅन्टीन सुविधा देखील गरजेनुसार उपलब्ध करून दिली जाईल. रोजगार मेळावा २८ मे रोजी सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना नवीन बिल्डिंग सभागृह, सहजानंदनगर, कोपरगाव येथे ठेवण्यात आले आहे. सर्व उमेदवारांनी क्युआर कोड स्कॅन करून फॉर्म भरणे आवश्यक आहे. सिलेक्ट झालेल्या उमेदवारांना ऑफर लेटर ई-मेलवर पाठवण्यात येईल. मुलाखतीसाठी येताना शैक्षणिक कागदपत्रे सोबत आणावीत.

# चंदनेश्वरचा स्वरगंध राष्ट्रीय सैनिक स्कूल प्रवेश परीक्षा उत्तीर्ण

**संगमनेर (तालुका प्रतिनिधी)–** तालुक्यातील चंदनापुरी येथील जनता शिक्षण प्रसारक संस्थेच्या चंदनेश्वर विद्यालयाचा विद्यार्थी स्वरगंध अमोल रहाणे याने राष्ट्रीय सैनिकी स्कूल प्रवेश प्रक्रिया उत्तीर्ण केली आहे. याबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

इयत्ता सहावीमध्ये सैनिकी स्कूलमध्ये प्रवेश घेण्यासाठी एनटीए परीक्षेचे आयोजन करत असते. या परीक्षेत चंदनेश्वर विद्यालयाचा पाचवीतील विद्यार्थी स्वरगंध अमोल रहाणे याने सुयश मिळविले आहे. यासाठी त्यास वाय. पी. साळुंके, पी. जी. मिंडे, ए. सी. शिरतार, एस. एस. जाधव यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य अशोक खेमनर, उपप्राचार्य के. जी. रहाणे, उपमुख्याध्यापक श्री. भंडकर, पर्यवेक्षक एस. एम. रहाणे, विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ, आजी-माजी विद्यार्थी, सरपंच, उपसरपंच, जिल्हा परिषद केंद्रशाळा आदिंनी अभिनंदन केले आहे.

# महावितरण ‘हाय अलर्ट’वर; मुसळधार पावसाच्या शक्यतेने उपाययोजना

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र तयार झाल्याने राज्यभरात पुढील तीन ते चार दिवस वादळ वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर महावितरणने यंत्रणेसाठी हाय अलर्ट जाहीर केला आहे. या कालावधीसह पावसाळ्यातील सुरळीत वीजपुरवठ्यासाठी आपत्कालिन नियोजन करण्यात आले आहे.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी शुक्रवारी (दि. २३) राज्यातील वीज पुरवठ्याचा आढावा घेतला. नैसर्गिक आपत्तीमुळे खंडित झालेला वीजपुरवठा तातडीने सुरू करण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे, मुख्यालय व परिमंडलस्तरावर २४७ आपत्कालिन व्यवस्थापन नियंत्रण कक्षाची लगेचच स्थापना करावी. कोणीही मुख्यालय सोडू नये असे निर्देश चंद्र यांनी दिले. व्हीडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या या बैठकीमध्ये संचालक (संचालन) सचिन तालेवार यांच्यासह राज्यातील मुख्य अभियंते, अधीक्षक अभियंते उपस्थित होते.

यंदा मान्सूनच्या आगमनापूर्वीच राज्यात वादळ वाऱ्यासह मुसळधार पावसाची दररोज हजेरी सुरू आहे. अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र सध्या स्थिर असले तरी त्याच्या प्रभावामुळे कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये वादळ वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता आहे. या परिस्थितीमध्ये सुरळीत वीजपुरवठ्याच्या उपाययोजनांसाठी ही बैठक झाली. दरम्यान, शुक्रवार (दि. २३) पासून मुख्यालय व राज्यातील आपत्कालिन व्यवस्थापन नियंत्रण कक्षांचे कामकाज सुरू झाले आहे. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक चंद्र म्हणाले, वीजपुरवठा खंडित झाल्यास तो तातडीने व वेळेत सुरू करण्यासाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात. एखाद्या ठिकाणी दुरुस्ती कामाला वेळ लागणार असेल तर त्याबाबत संबंधित ग्राहकांना एसएमएसद्वारे, व्हॉटस् अप ग्रुप्स, ट्वीटर व सोशल मिडिया, प्रसिद्धी माध्यमांद्वारे ताबडतोब कळविण्यात यावे. खंडित वीजपुरवठ्याच्या कालावधीबाबत मुख्यालयाकडून पर्यवेक्षण करण्यात येत आहे. शक्य असूनही वीजपुरवठा वेळेत सुरू झाला नाही, तर त्याची गंभीर दखल घेण्यात येईल. सुरळीत वीजपुरवठ्यासाठी कोणत्याही प्रकारची हयगय खपवून घेतली जाणार नाही. त्यासाठी क्षेत्रीय वरिष्ठ अभियंत्यांनी मोठ्या व गंभीर बिघाडाच्या ठिकाणी स्वतः जाऊन दुरुस्ती कामांना वेग द्यावा. तसेच महावितरणच्या कोणत्याही कर्मचाऱ्याने पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये असे स्पष्ट निर्देश चंद्र यांनी दिले.

वादळवारा व मुसळधार पावसामुळे वीज यंत्रणेचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रत्येक परिमंडल स्तरावर विजेचे खांब, रोहित्र, वीजतारा, ऑईलसह इतर यंत्रसामग्री उपलब्ध ठेवावी. पावसामुळे नादुरुस्त झालेल्या वीज यंत्रणेच्या दुरुस्तीसाठी संबंधित अभियंते, कर्मचाऱ्यांना तसेच सर्व एजन्सींना मनुष्यबळ, सामग्री व वाहनांसह युद्धपातळीवर तयार राहण्याची सूचना श्री. लोकेश चंद्र यांनी केली. या पद्धतीने मान्सूनच्या आगमनानंतर पावसाळी परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी महावितरणच्या यंत्रणेने सज्ज राहावे असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच काम करत असताना सुरक्षा संबंधी सर्वोतोपरी काळजी घेण्याचे निर्देशही देण्यात आले.

**नगरमध्ये विजेचा लपंडाव**

नगरमध्ये गेल्या दोन दिवसापासून विजेचा लपंडाव सुरू आहे. विशेष करून वादळ आणि पावसानंतर नगर शहरातील, उपनगरातील एमआयडीसी भागात विज गायब होण्याच्या घटना वाढतांना दिसत आहे. दरवर्षी पावसाळ्यात हा प्रकार सुरू असून यामुळे नागरिक त्रस्त दिसत आहेत. यंदा अवकाळी पावसाच्या सुरूवातीलाच विजेचा लपंडाव वाढला असून महावितरणने अखंड वीजपुरवठा सुरू ठेवण्यासाठी प्रयत्न करण्याची मागणी होत आहे.

**दिवसभर पावसाची रिपरिप**

शुक्रवारी पहाटेपासून नगर शहरासह उपनगरात तालुक्याच्या विविध भागात पावसाची रिपरिप सुरू होती. राहून राहून पावसाच्या सरीवर सरी कोसळत होत्या. या पावसाला जोर नसला तरी मान्सून सक्रिय झाल्यावर ज्या प्रमाणे पाऊस पडतो, त्याच प्रमाणाने अवकाळी पावसाने गेल्या काही दिवसांपासून लावून धरल्याने नगर शहरात ऐन महिन्यांत सर्वत्र रस्त्यावर पाणी साठल्याचे दिसून आले. सायंकाळी उशीरा पावसाची सुरू असणारी भूरभूर थांबवली होती.

# हैदराबाद विजयी; बंगळुरूचा ४२ धावांनी पराभव

**दिल्ली–** सनरायजर्स हैदराबादने आयपीएलच्या १८ व्या मोसमातील ६५ व्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुवर ४२ धावांनी मात केली आहे. हैदराबादने आरसीबीला विजयासाठी २३२ धावांचं आव्हान दिलं होतं. मात्र हैदराबादच्या गोलंदाजांनी आरसीबीला १९.५ ओव्हरमध्ये १८९ धावांवर गुंडाळलं. हैदराबादचा हा या हंगामातील पाचवा विजय ठरला. हैदराबादने या विजयासह आरसीबीच्या अडचणीत वाढ केलीय. प्लेऑफमध्ये पोहचलेल्या आरसीबीला या सामन्यात विजय मिळवून पॉइंट्स टेबलमध्ये पहिल्या स्थानी पोहचण्याची संधी होती. मात्र हैदराबादने आरसीबीला नंबर १ होण्यापासून रोखलं. इतकंच नाही, तर आरसीबीला या पराभवामुळे नेट रनरेटमध्येही फटका बसला आहे. आरसीबीची पॉइंट्स टेबलमध्ये दुसऱ्या स्थानावरुन तिसऱ्या स्थानी घसरण झाली आहे. तसेच नेट रनरेटमध्येही फटका बसला आहे. आरसीबीचा नेट रनरेट हा सामन्यआधी +०.४८२ असा होता. तोच नेट रनरेट पराभवानंतर +०.२५५ असा झाला.



आरसीबीची विजयी धावांचा पाठलाग करताना अप्रतिम सुरुवात झाली. फिलिप सॉल्ट आणि विराट कोहली या सलामी जोडीने ८० धावांची भागीदारी केली. विराटला चांगली सुरुवात मिळाली. विराटला मोठी खेळी करण्याची संधी होती.मात्र हर्ष दुबे याने हैदराबादसाठी डोकेदुखी ठरत असलेली ही सलामी जोडी फोडली. हर्षने विराटला आऊट केलं. विराटने २५ बॉलमध्ये ४३ रन्स केल्या. त्यानंतर मयंक अग्रवाल आणि सॉल्ट या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी ४० धावा जोडल्या. मयंक अग्रवाल आरसीबीच्या १२० धावा असताना आऊट झाला. मयंकने ११ रन्स केल्या. मयंकनंतर फिल सॉल्ट हा देखील आऊट झाला. सॉल्ट ५ सिक्स आणि ४ फोरसह ३२ बॉलमध्ये ६२ रन्स केल्या. त्यामुळे आरसीबीचा स्कोअर ३ आऊट १२९ असा झाला. त्यानंतर रजत पाटीदार आणि कॅप्टन जितेश शर्मा या दोघांनी काही वेळ मैदानात घालवला. त्यामुळे आरसीबीला विजयाची आशा होती. मात्र ही जोडी फुटली आणि आरसीबी घसरगुंडी सुरु झाली. रजत पाटीदार १८ रन्सवर आऊट झाला. त्यानंतर जितेश शर्मा याचा अपवाद वगळता ५ जणांना दुहेरी आकडाही गाठता आला नाही. जितेशने १५ बॉलमध्ये २४ रन्स केल्या. तर कृणाल पंड्या ८, भुवनेश्वर कुमार आणि यश दयाल या दोघांनी प्रत्येकी ३ -३ धावा केल्या. टीम डेव्हीडकडून खूप आशा होत्या. मात्र त्याला दुखापतीमुळे काहीच करता आलं नाही. डेव्हिडने १ धाव केली. तर रोमरियो शेफर्ड याला भोपळाही फोडता आला नाही. हैदराबादसाठी कर्णधार पॅट कमिन्स याने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. ईशान मलिंगा याने एकाच ओव्हरमध्ये २ विकेट्स मिळवल्या. तर जयदेव उनाडकट, हर्षल पटेल, हर्ष दुबे आणि नितीश कुमार रेड्डी या चौघांनी प्रत्येकी १-१ विकेट घेतली.

**पहिल्या डावात काय झालं?**

दरम्यान त्याआधी आरसीबी कर्णधार जितेश शर्मा याने टॉस जिंकून फिल्डिंगचा निर्णय घेतला आणि सनरायजर्स हैदराबादला बॅटिंगसाठी भाग पाडलं. हैदराबादने २० ओव्हरमध्ये ६ विकेट्स गमावून २३१ धावा केल्या. हैदराबादसाठी ईशान किशन याने सर्वाधिक ९४ धावांचं योगदान दिलं. ईशानच्या या खेळीत ७ चौकार आणि ५ षटकारांचा समावेश होता. ओपनर अभिषेक शर्मा याने ३४ रन्स केल्या. अनिकेत वर्मा याने २६ तर हेन्रिक क्लासेनने २४ धावा केल्या. ट्रेव्हिस हेडने १७ धावा करुन मैदानाबाहेरचा रस्ता धरला. नितीश रेड्डीने ४ धावांचं योगदान दिलं. तर अभिनव मनोहर आणि पॅट कमिन्स जोडी नाबाद परतली. अभिनवने १२ तर पॅटने १३ रन्स केल्या. आरसीबीकडून रोमरियो शेफर्डने सर्वाधिक २ विकेट्स घेतल्या. तर भुवनेश्वर कुमार, लुंगी एन्गिडी, सुयश शर्मा आणि कृणाल पंड्या या चौकडीने प्रत्येकी १-१ विकेट घेतली.

# ७ हजार ६५२ कारागिरांना प्रशिक्षण तर ५०४ जणांना कर्जाचे वितरण

## प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** भारत सरकारच्या प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेफ्ला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत ७ हजार ६३२ पारंपरिक कारागिरांना १५ प्रशिक्षण केंद्रांमार्फत प्रशिक्षण देण्यात आले आहे. यापैकी ५०४ कारागिरांना बँकांमार्फत कर्ज वितरित करण्यात आले असून उर्वरित लाभार्थ्यांच्या कर्ज प्रक्रियेस गती देण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी बालासाहेब मुंडे यांनी दिली.

ही योजना पारंपरिक कलेचा सन्मान राखत कारागिरांना आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षण व आर्थिक सहाय्य प्रदान करणारी आहे. देशाच्या सांस्कृतिक व औद्योगिक परंपरेला बळकटी देणाऱ्या या योजनेचा उद्देश पारंपरिक व्यवसायात गुंतलेल्या कारागिरांना व्यावसायिकदृष्ट्या सक्षम करणे हा आहे. योजनेअंतर्गत पारंपरिक कौशल्य असलेल्या व्यक्तींना व्यवसायासाठी एकूण ३ लाख रुपयांपर्यंत कर्ज केवळ ५ टक्के व्याजदराने मिळू शकते. पहिल्या टप्प्यात १ लाख व दुसऱ्या टप्प्यात व्यवसाय विस्तारासाठी २ लाख रुपये मंजूर केले जातात. प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या लाभार्थ्यांना दररोज ५०० रुपये स्टायपेंड दिला जातो. योजनेत सुतार, लोहार, मूर्तिकार, सोनार, नाभिक, धोबी, कुंभार, चर्मकार, विणकर, राजमिस्त्री, नाव बनवणारे, घंटा घडवणारे, तांब्या-पितळ काम करणारे, घड्याळ व दुरुस्ती करणारे, खेळणी बनवणारे, चाकू-कात्री धार करणारे, झाड्यांचे काम करणारे व झोळ्या-सुतपिशव्या तयार करणारे व्यवसाय समाविष्ट आहेत.

प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना ही पारंपरिक कौशल्यांना नवसंजीवनी देणारी असून ग्रामीण व शहरी कारागिरांना आत्मनिर्भरतेकडे नेणारे महत्त्वाचे माध्यम ठरत आहे. पारंपरिक व्यवसायांना नवचैतन्य देत ही योजना आत्मनिर्भर भारतच्या दिशेने एक भक्कम पाऊल आहे.

**डिजिटल साक्षरता, ब्रँडिंग व विपणन प्रशिक्षण**

योजनेत कारागिरांना उत्पादनांचे ब्रँडिंग, विपणन व डिजिटल व्यवहारासाठी प्रशिक्षण दिले जात आहे. सोशल मिडिया व ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर उत्पादने विक्रीसाठी मार्गदर्शनही दिले जाते.

**पात्रता व आवश्यक कागदपत्रे**

अर्जदार भारताचा नागरिक असावा, वय १८ ते ५० वर्षांदरम्यान असावे व १८ पारंपरिक व्यवसायांपैकी कोणत्याही एकाशी संबंधित असावा. अर्जासाठी आधार कार्ड, पॅन कार्ड, उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, ओळखपत्र, रहिवासी दाखला, पासपोर्ट साइज छायाचित्र, बँक पासबुक व मोबाईल क्रमांक आवश्यक आहेत.

# अवकाळीमुळे २२ हजार हेक्टर क्षेत्राचे नुकसान

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात सुरु असलेल्या गारपीट आणि अवकाळी पावसाचा २१ जिल्ह्यातील तब्बल २२ हजार २३३ हेक्टरवरील पिकाला फटका बसला आहे. शेतात उभ्या असेलल्या पिकाचे अनोतान नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. साधारणपणे १ मेपासून सुरु झालेला अवकाळी पाऊस, वादळीवारे आणि गारपीटीमुळे केळी, आंबा, मका, संत्रा, धान, भाजीपाला, फळपीकांचे मोठे नुकसान झाले आहे. सध्या पंचनामे सुरु आहेत. त्यामुळे प्रत्यक्षात आकडा वाढण्याची शक्यता आहे.

राज्यात नाशिक, जळगाव, धुळे, नंदूरबार, अहिल्यानगर, ठाणे, पालघर, रायगड, पुणे, जालना, परभणी, बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, वाशीम, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली या २१ जिल्ह्यांमध्ये साधारणपणे १ मेपासून अवेळी पावसाला सुरवात झाली. सोबत वादळीवारे आणि गारपीटीमुळे या जिल्ह्यातील शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. केळी, जांभूळ, आंबा, भात, चिकू, बाजरी, मका, डाळींब, कांदा, भाजीपाला, पपई, मूग, उडीद, ज्वारी, भुईमूग, संत्रा, धान तसेच फळपिकांचे नुकसान झाले आहे.

मदत आणि पुनर्वसन विभागाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अमरावती जिल्ह्यातील अचलपूर, भातकुली, चांदूरबाजार, चिखलदरा तालुक्यातील तब्बल १० हजार ६३६ हेक्टर, जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव, जामनेर, रावेर, भडगाव, एरंडोल, मुक्ताईनगर, धरणगाव, बोदवड, पारोळा, अमळनेर तालुक्यातील ४ हजार ३९६ हेक्टर, जालना जिल्ह्यातील अंबड, मंठा, बदनापूर, परतूर,जालना तालुक्यातील १ हजार ६९५ हेक्टर, नाशिक जिल्ह्यातील सिन्नर, निफाड, बागलाण, त्रंबकेश्वर, सुरगाणा, मालेगाव, दिंडोरी तालुक्यात १ हजार ७३४ हेक्टर, पालघर जिल्ह्यातील पालघर, तलासरी, डहाणू, वाडा, विक्रमगड, वसई तालुक्यातील ७९६ हेक्टर, चंद्रपूर जिल्ह्यात १ हजार ३८ हेक्टर शेतीचे नुकसान झाले आहे.

# डॉ. बाबुराव उपाध्ये यांची संतसाहित्य संमेलन अध्यक्षपदी निवड

**शिरसगाव (वार्ताहर)–** येथील श्रीसंत गोरा कुंभार प्रतिष्ठानचे संस्थापक डॉ. बाबुराव दत्तात्रय उपाध्ये यांची वडाळा महादेव येथे रविवार दि.१ जून रोजी होणाऱ्या श्रीसंत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज एक दिवशीय संतसाहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील लोककला कलावंत, साहित्यिक परिषद, महाराष्ट्र राज्य यांनी १ जून रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत श्रीसंतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संतसाहित्य संमेलनाचे आयोजन केले आहे.



वडाळा महादेव येथील प्राचीन देवालय असलेल्या त्र्यंबकेश्वर सभागृहात होणाऱ्या या सोहळ्याचे स्वागताध्यक्ष म्हणून राहाता येथील साहित्यिक राजेंद्र फंड, उद्घाटक उक्कलगाव येथील बाबा महाराज ससाणे आदी मान्यवर उपस्थित राहणार असल्याचे मुख्य संयोजक साहित्यिक बाबासाहेब पवार यांनी सांगितले. संतसाहित्य परिसंवाद, दोन सत्रात कवीसंमेलन, चित्रप्रदर्शन, अभंग, गवळणी, भारूड आदी कार्यक्रम होणार आहेत.

## पान १ वरुन

### कृषी, पशुसंवर्धन, वन विभाग राज्यात अव्वल

कार्यप्रणालीत सुधारणा घडवून आणणे, सेवांचा कार्यक्षम वितरण, डिजिटल प्रक्रिया वाढवणे, आणि जनतेच्या तक्रारींवर वेगाने कार्यवाही करणे हा या मोहिमेचा उद्देश होता.

या विशेष मोहिमेत कार्यालयीन प्रक्रियेतील कार्यालयातील संकेतस्थळ अद्यावत करणे, सुकर जीवनमान, स्वच्छता अभियान राबविणे, विविध योजने अंतर्गत तक्रार निवारण करणे, कार्यालयीन सोई सुविधा उपलब्ध करणे, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देणे, कार्यालयीन ई-ऑफिस प्रणाली अद्यावत करणे, आर्थिक व औधोगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन, अधिकारी, शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सेवा, कर्मचारी प्रशिक्षण व सेवा विषयक बाबी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान वापर करणे, नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे, इत्यादी विषयांचे अनुषंगाने कार्यालयीन सुविधा राबविण्यात आलेल्या. या १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिम अंतर्गत सरकारने ठरवून दिलेल्या सेवामध्ये अति उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल अहिल्यानगर जिल्ह्याने तीन शासकीय विभागात राज्यस्तरावर प्रथम क्रमाकाचे पारितोषिक मिळविले आहे. यात जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाने ई-ऑफिस प्रणाली कार्यान्वीत करत राज्यात असा उपक्रम राबवणारे पहिले क्षेत्रीय कार्यालय ठरले आहे. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास नुकतेच आयएसओ मानांकन देखील मिळाले. जिल्हा कृषि कार्यालयास भेटी देणाऱ्या शेतकरी व इतर अभ्यागतासाठी सुसज्ज प्रतीक्षालय, कृषि ग्रंथालय सुरु करण्यात आले असून अभ्यागत कक्ष सर्व सुविधांनी सुसज्ज आहे. शासकीय अभिलेखांचे वर्गीकरण अतिशय आखीव रेखीव पद्धतीने करण्यात येऊन निरुपयोगी वस्तूंचे जडसंग्रहांचे निर्लेखन केल्याने कामकाजात गतिमानता येण्यास मदत झाली आहे. तसेच शेतकऱ्यांबरोबर संपर्क वाढवून कृषी तंत्रज्ञानाच्या प्रचार व प्रसारासाठी व्हॉट्सॲप चैनल सुरू केले आहे. अशीच कामगिरी पशूसंवर्धन विभाग उपायुक्त कार्यालयाने राबवली असून यात जनावरांचे लसीकरण, शेतकऱ्यांच्या तक्रारीसह विविध योजनांचा ऑनलाईन लाभ यांचा यशस्वीपणे राबवलेला आहे. उपवन संरक्षक कार्यालयाने देखील अतिउत्कृष्ठ कामगिरी केल्याने ते देखील राज्यात पहिल्या क्रमांकावर आहे. तसेच नगरच्या जिल्हा व्यवस्थापन शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, अधिक्षक अभियंता महावितरण व जिल्हा सांख्यिकीक अधिकारी कार्यालयाने राज्यात त्यांच्या विभागात तिसरा क्रमांक पटकावला आहे.

### लाडक्या बहिणींसाठी पुन्हा...

सरकारची आर्थिक आघाडीवर दमछाक होऊ लागल्याने सरकारला आता मागासवर्गीय आणि आदिवासी समाजासाठी कल्याणकारी योजना आखणाऱ्या सामाजिक न्याय तसेच आदिवासी विकास खात्याचा निधी वळवावा लागत आहे.

राज्य सरकारने सन २०२५-२६ या वर्षीच्या अर्थसंकल्पात अनुसूचित जमाती उपयोजनेसाठी २१ हजार ४९५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यापैकी आदिवासी विकास खात्याला देण्यात आलेल्या ३ हजार ४२० कोटी रुपयांच्या सहाय्यक अनुदानातून मे महिन्यासाठी ३३५ कोटी ७० लाख रुपयांचा निधी लाडकी बहीण योजनेसाठी वळविण्यात आला आहे. एप्रिल महिन्यात सुद्धा ३३५ कोटी ७० लाख रुपयांचा निधी महिला आणि बालविकास विभागाकडे वर्ग करण्यात आला होता. आता आदिवासी विकास खात्यातून प्रत्येक महिन्याला असा निधी वळता केला जाणार आहे.

### अरुंद शेत रस्ते होणार १२ फुटांचे!

झाल्यापासून ९० दिवसांच्या प्रकरण निकाली काढण्याबाबत शासन आदेश जारी केले आहेत पारंपरिक शेत रस्ता बांधणीच्या १९६६ च्या महाराष्ट्र महसूल संहितेतील कलमानुसार प्रथमच सुमारे ६० वर्षांनी महाराष्ट्राच्या आधुनिक शेतीसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

शेतकऱ्यांना आधुनिक शेती आणि उत्पन्नवाढीसाठी या निर्णयाचा नक्की लाभ होईल. प्रथम शेत रस्त्याची आवश्यकता तपासावी, शेजारच्या भूधारकाच्या वहिवाटीच्या हक्कांचा, त्यांच्या अडचणी, अपेक्षांचा विचार करावा. रस्त्याची रुंदी वाढवण्यासाठी यांत्रिकीकरणानुसार निर्णय घ्यावा. अनावश्यक रुंदीकरण करू नये, अशा सूचना महसूल अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

**चंद्रशेखर बावनकुळे**, महसूलमंत्री

### जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय...

करण्यात येणार आहे. महाविद्यालयाची स्वच्छता, आहार, सुरक्षा, वस्त्र स्वच्छता ही कामे बाह्यस्त्रोतामार्फत केली जाणार आहेत. महाविद्यालय आणि रुग्णालय उभारणीसह सुविधानिर्मितीसाठी ४८५ कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करुन खर्चास मान्यता देण्यात आली आहे. चार वर्षानंतर प्रतिवर्षी ४३ कोटी ६१ लाख इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. जिल्हा रुग्णालयात महाविद्यालय सुरु करण्यासाठी इमारतीमधील किरकोळ बदल व आवश्यक डागडुजीसाठी पाच कोटी, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यक्रमासंबंधी (प्रथम व द्वितीय वर्ष एमबीबीएस) यंत्रसामुग्री खरेदी, फर्निचर व ग्रंथालयासाठी पुस्तके इत्यादीसाठी २० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**रुग्णालयाची इमारत २१ हजार चौ.मी. जागेत**

वैद्यकीय महाविद्यालयाची इमारत ६ हजार ४५० चौ. मी. एवढ्या जागेत उभी राहणार आहे. यासाठी अंदाजित २९ कोटी ९० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. अचिकित्सालयीन व चिकित्सालयीन विभागासाठी १३ कोटी ६० लाख, रुग्णालयीन इमारत २१ हजार ३२३ चौ.मी. जागेत असणार आहे. यासाठी ९५ कोटी ५२ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. अधिकारी, कर्मचारी आवास आणि विद्यार्थी वसतिगृह यासाठी ७८ कोटी ७३ लाखांची तरतूद करण्यात आली आहे.

### अमेरिकेतून भारतात पैसे पाठवणे...

३० अब्ज डॉलर्सच्या रेमिटन्सवर १.०५ अब्ज डॉलर्सचा अतिरिक्त भार पडेल म्हणजेच सुमारे ८,७५० कोटी रुपये, ज्याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम होईल.

**कर दर: ३.५%**

कर = रु. १,००,००० ÷ ३.५% = रु. १,००,००० ÷ ०.०३५ = रु. ३,५००

१,००,००० रुपये पाठवण्यासाठी स्थलांतरितांना ३,५०० रुपये कर भरावा लागेल.

### भारतात आयफोन बनवल्यास...

किमान २५% टॅरिफचा सामना करावा लागेल. ट्रम्प यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ट्रुथवर लिहिले, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना पलची उत्पादने भारतात तयार होऊ नयेत असे वाटते. गेल्या आठवड्यात ट्रम्प यांनी कंपनीचे सीईओ टिम कुक यांना सांगितले होते की भारतात कारखाने उभारण्याची गरज नाही. भारत स्वतःची काळजी घेऊ शकतो.

गुरुवारी (१५ मे) कतारची राजधानी दोहा येथे व्यावसायिक नेत्यांसोबत झालेल्या कार्यक्रमादरम्यान ट्रम्प यांनी ॲपलच्या सीईओंसोबतच्या या संभाषणाची माहिती दिली. त्यांनी म्हटले होते की, पलला आता अमेरिकेत उत्पादन वाढवावे लागेल.

असे असूनही, पलची सर्वात मोठी कंत्राटी उत्पादक कंपनी फॉक्सकॉनने भारतात १.४९ अब्ज डॉलर्स (सुमारे १२,७०० कोटी रुपये) गुंतवणूक केली आहे. फॉक्सकॉनने त्यांच्या सिंगापूर युनिटद्वारे गेल्या ५ दिवसांत तामिळनाडूच्या युझान टेक्नॉलॉजी (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेडमध्ये ही गुंतवणूक केली आहे.

### मतदान केंद्राबाहेर मोबाईल...

काही ठिकाणी परिस्थिती बिघडण्याची शक्यता असल्यास निवडणूक निर्णय अधिकारी याला अपवाद देऊ शकतात. मतदान गुप्ततेचा नियम यापुढेही काटेकोरपणे पाळला जाणार आहे. प्रचाराच्या संदर्भातही महत्त्वाचा बदल करण्यात आला असून, मतदान केंद्राच्या १०० मीटर अंतराच्या आत प्रचारास मनाई करण्यात आली आहे.